# सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना चमुतर्फे कारगील विजय दिवस साजरा

सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात दिनांक २६ जुलै २०११ रोजी रासेयो चमुतर्फे कारगील विजय दिवस साजरा करण्यात आला.

२६ जुलै १९९९ च्या कारगील युध्दात भारताला विजय मिळाला म्हणुन हा दिवस कारगील विजय दिन म्हणुन साजरा केला जातो. कारगील युध्द हे एक मर्यादित युध्द म्हणुन देखील ओळखल्या जाते. या युध्दात स्वाभिमान आणि सन्मानाच्या रक्षेसाठी भारतीय जवानांनी ''करो या मरो'' चा सिध्दांत स्विकारला होता. हा दिवस सर्व भारतीयांसाठी अविस्मरणीय आणि अभिमानास्पद आहे. अशा प्रस्तावनेव्दारा कु. ऋतुजा मोहोड हिने कारगील युध्दाची माहिती दिली.

त्यानंतर चलचित्रफिताव्दारे शहीद जवानांबाबत प्रत्यक्ष माहितीपर दर्शविण्यात आले. श्री. शेखर भातकुले सरांचे राष्ट्रभक्तीपर व्याख्यान देण्यात आले.

वरील कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. जगदीशभाऊ गुप्ता व प्राचार्य डॉ. संजय खेरडे सरांचे मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. योगेश गुल्हाने, प्रा. संगिता गुडधे, विद्यार्थी प्रतिनिधींनी केले. विभागप्रमुख डॉ. अविनाश गावंडे, डॉ. विजया शाडिल्य, विद्यार्थी कार्यक्रम अधिष्ठाता डॉ. प्रविण मळसने, शिक्षकवृंद, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.




